**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
मंत्रालय (विस्तार), ५ वा मजला, दालन क्र.५५३,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी क्र ०२२-२२०२७०७४ Email ID : exc3.home@maharashtra.gov.in

---

क्रमांक : बीडब्ल्यूआर-११२१/प्र.क्र.१८७ (भाग-१)/राउशु-३ दिनांक : ०४ एप्रिल, २०२२

प्रति,

आयुक्त,
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय** :- सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरमध्ये कुलूपबंद कपाटामधून (Shelf in Shop) पध्दतीने वाईनची विक्री करण्याची संकल्पना राबविणे. नियमात दुरुस्ती करण्याकरिता प्रारुप अधिसूचनेवर हरकती व सूचना मागविण्याबाबत.

महोदय,

राज्य मंत्रिमंडळाच्या दि.२७.१.२०२२ च्या बैठकीत सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरमध्ये कुलूपबंद करता येईल अशा कपाटामधून (Shelf in Shop), मद्यसेवन परवानाधारकास सीलबंद बाटल्यामध्ये केवळ वाईनची विक्री करण्यास परवानगी देण्यासाठी नियमात सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे.

२. सदर निर्णयाच्या अनुषंगाने विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२ मध्ये सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १४३ मधील तरतूदीनुसार प्रारुप नियमांच्या मसूद्यावर नागरिकांच्या हरकती/ सूचना मागविण्याचा निर्णय झाला आहे. त्यानुषंगाने प्रारुप नियम शासन अधिसूचना, दि.३१ मार्च, २०२२ अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आले आहेत. (प्रत सोबत). सदर प्रारुप नियमांबाबत असलेल्या हरकती व सूचना आपल्या कार्यालयाकडे टपालाद्वारे अथवा *dycomm-inspection@mah.gov.in* या ई-मेलवर पाठविण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

३. यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, राज्यातील नागरिकांच्या माहितीसाठी सदर अधिसूचना विभागाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात यावी व या अधिसूचनेबाबत राज्यातील प्रमुख वर्तमानपत्रात (मराठी व इंग्रजी) / माध्यमांमध्ये व्यापक प्रसिध्दी देण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. तसेच, सदर प्रकरणी नागरिकांकडून प्राप्त होणा-या हरकती / सूचनांबाबतचे कामकाज हाताळण्यासाठी आपल्या कार्यालयातील एका जबाबदार अधिका-याची समन्वय

अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

४. उपरोक्त अधिसूचनेद्वारे विहित केलेला ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर नागरिकांकडून प्राप्त झालेल्या हरकती /सूचना यांचा सविस्तर तपशील आपल्या अभिप्रायासह शासनास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आदरपूर्वक !

आपला

सहपत्र : वरीलप्रमाणे

**( युवराज ब. अजेटराव )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

कार्यासन राउशु-३ (संग्रहार्थ).

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ८, अंक ४३(५)] गुरुवार, मार्च ३१, २०२२/चैत्र १०, शके १९४४ [पृष्ठे १०, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १०१

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ मार्च, २०२२.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक बीडब्ल्युआर-११२१/प्र.क्र. १८७ (भाग-१)/राउशु-३.—महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ (१९४९ मुंबईचा पंचवीस) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) (ख) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासनाने विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२, मध्ये सुधारणा करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा हा त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि

याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, उक्त मसुदा, महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २९ जून २०२२ नंतर विचारात घेण्यात येईल.

२. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी, उक्त मसुद्याच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, दुसरा मजला, जूने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ०२३ यांच्याकडे टपालाद्वारे अथवा *dycomm-inspection@mah.gov.in* या ई-मेल वर प्राप्त होतील त्या शासन विचारात घेईल.

**प्रारुप नियम**

**१.** या नियमांना, विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती (सुधारणा) नियम, २०२२ असे संबोधण्यात यावे.

**२.** विशेष परवाने आणि अनुज्ञप्ती नियम, १९५२, मधील नियम ६ नंतर खालील नियम समाविष्ट करण्यात येत आहेत :—

" ७. सुपर मार्केटमध्ये मांडणी किंवा शेल्फद्वारे सीलबंद बाटलीमध्ये वाईन विक्री परवान्यासाठीचा अर्ज-

(१) किमान १०० चौ.मीटर क्षेत्रफळ असलेल्या व स्वतः स्वयंसेवेने खरेदी करण्याची सुविधा असलेल्या तसेच, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवा शर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ (महा. २०१७ चा एकसष्टावा) च्या कलम ६ अन्वये नोंद असलेल्या सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरचा कोणताही मालक किंवा व्यवस्थापक, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७० डी अंतर्गत जारी केलेल्या फॉर्म एफएलएक्स/सी परवाना धारण केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, सीलबंद बाटल्यांमध्ये वाईन विक्रीसाठी त्यांच्या आस्थापनेमध्ये

मांडणी किंवा शेल्फ उभारू इच्छित असल्यास, जिथे त्याचे दुकान आहे त्या जिल्ह्याच्या अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे ई-३ नमुन्यात शुल्क रु. १००/- भरणा केलेल्या चलनासह परवान्यासाठी अर्ज करेल.

(२) अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना प्रस्ताव परिपूर्ण असल्याची खात्री झाल्यानंतर, वाईन विक्रीची प्रस्तावित जागा ही नियमातील तरतुदीनुसार आणि राज्य शासनाने किंवा आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार योग्य असल्यास व अनुज्ञप्ती मंजुरीसाठी आक्षेप नसल्यास, रु.१००० एवढी अनामत रक्कम आणि सदर अनुज्ञप्तीचे आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क यांनी वेळोवेळी निश्चित केलेले अनुज्ञप्ती शुल्क वसूल करून नमुना ई-४ ही अनुज्ञप्ती मंजूर करू शकतात.

(३) खालील जागेच्या बाबतीत उप नियम (२) अन्वये अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येऊ नये,-

(अ) की जे, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांच्या मते, वाईन विक्रीसाठी असलेला मांडणी किंवा शेल्फ योग्य रितीने मांडलेला नाही अथवा जागेमध्ये एकापेक्षा जास्त मांडणी किंवा शेल्फ आहेत किंवा २.२५ घनमीटर पेक्षा जास्त घनफळ असलेली मांडणी किंवा शेल्फ असल्यास ; अशा मांडणी किंवा शेल्फला आवश्यकतेनुसार कुलुपबंद करता येत नाही; अशी मांडणी किंवा शेल्फ सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरच्या प्रवेशद्वारात किंवा समोरच्या भागात ठेवले असल्यास आणि अशी मांडणी किंवा शेल्फ रस्त्यावरून जाणाऱ्यांच्या सहज नजरेस पडत असल्यास ; किंवा

(ब) अशी जागा कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा ‘ अ ’ किंवा ‘ ब ’ वर्गाच्या नगरपालिका हद्दीत असेल, तर अशा दुकानापासून ५० मीटर अंतराच्या आत व इतर ठिकाणी असल्यास, १०० मीटरच्या आत कोणतीही शैक्षणिक किंवा धार्मिक संस्था किंवा कोणताही राष्ट्रीय व्यक्तीमत्त्वाचा पुतळा असेल ; किंवा

(क) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा बस थांबा, स्थानक किंवा आगार या ठिकाणापासून १०० मीटर अंतराच्या आत असेल ; किंवा

(ड) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी अनुज्ञप्ती मंजूर करण्यापूर्वी जागा मंजूर केली नसल्यास आणि सदरील जागा दुकान स्थापित करण्यास योग्य नसल्याचे लिखित स्वरुपात कारणे नमूद करून प्रमाणित केले असल्यास,

**स्पष्टीकरण- या पोट-नियमाकरिता——**

(एक) “ शैक्षणिक संस्था ” म्हणजे कोणतीही पूर्व प्राथमिक, प्राथमिक किंवा माध्यमिक शाळा ज्यांचे व्यवस्थापन किंवा मान्यता हे स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा राज्य शासन किंवा केंद्र शासनाकडून आणि विद्यापीठ कायद्यानुसार स्थापन झालेल्या एखाद्या विद्यापीठाशी संलग्न असलेले महाविद्यालय परंतु यामध्ये कोणत्याही खाजगी शिकवणी संस्थेचा समावेश होत नाही ;

(दोन) “ धार्मिक संस्था ” म्हणजे एखाद्या धर्माच्या प्रचारासाठी स्थापन झालेली संस्था आणि त्यात मंदिर, मठ, मशीद, चर्च, ज्यू लोकांचे प्रार्थना स्थान, अग्यारी किंवा इतर असे कोणतेही धार्मिक प्रार्थना स्थळ जे महाराष्ट्र सार्वजनिक न्यास कायदा, १९५० (१९५० चा मुंबई २९) अन्वये व ज्याचे व्यवस्थापन किंवा मालकी सार्वजनिक विश्वस्ताकडे असेल व नोंदणीकृत असेल आणि राज्य शासनाकडून याबाबतीत विशेष करून आदेशित केलेली इतर धार्मिक संस्था यांचा समावेश केलेला असेल;

(तीन) या उप-कलमाच्या खंड (ब) किंवा (क) मध्ये नमूद केलेले अंतर हे दुकानाच्या प्रवेशद्वाराच्या मध्यबिंदुपासून जवळच्या मार्गाने मोजले जाईल, ज्याने सामान्यतः पादचारी पोहोचतात,——

(अ) एखाद्या संस्थेला जर संरक्षक भिंत असेल तर जवळच्या प्रवेशद्वाराच्या मध्यबिंदूपासून व जर संरक्षक भिंत नसेल तर संस्थेच्या प्रवेशमार्गाच्या मध्यबिंदूपासून ; किंवा

(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या बस थांबा, स्थानक किंवा आगाराला संरक्षक भिंत असल्यास अशा ठिकाणच्या जवळच्या प्रवेशद्वाराच्या मध्यबिंदूपासून व जर अशा ठिकाणी संरक्षक भिंत नसेल तर असे बस स्थानक किंवा आगाराच्या जवळच्या हद्दीपासून ; किंवा

(क) पुतळ्यास संरक्षक भिंत असल्यास, अशा ठिकाणच्या जवळच्या प्रवेशद्वाराच्या मध्यबिंदूपासून आणि जर अशा ठिकाणी संरक्षक भिंत नसेल, तर पुतळ्याच्या पायाच्या जवळच्या बिंदूपासून ;

(चार) “ राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा ” म्हणजे शासन मान्यताकृत असलेला कोणताही राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा जो या नियमासोबतच्या अधिसूचीमध्ये विशद करण्यात आलेला आहे.

(४) एखाद्या जागेत नमुना ई-४ अनुज्ञप्ती मंजूर झाल्यावर, या उप-नियम (३) चे खंड (ब) किंवा (क) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे सदर दुकान प्रतिबंधित अंतराच्या आत आहे असे समजले जाणार नाही, जर अशी अनुज्ञप्ती मंजूर झाल्यावर कोणत्याही वेळी,—

(अ) पोट-नयम (३) च्या खंड (ब) मध्ये उल्लेख केलेली एखादी संस्था अथवा राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती यांचा पुतळा त्या जागेपासून ५० मीटर अंतराच्या आत किंवा १०० मीटरच्या आत जशी स्थिती असेल त्याप्रमाणे, अस्तित्वात आल्यास किंवा ;

(ब) पोट-नियम (३) च्या खंड (क) मध्ये उल्लेख केलेले बस थांबा, बस स्थानक किंवा बस आगार त्या जागेपासून १०० मीटरच्या आत अस्तित्वात आल्यास.

(५) अनुज्ञप्तीधारकास आवश्यक वाईन ही मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अन्वये मंजूर व्यापार व आयात अनुज्ञप्तीधारक व्यक्ती अथवा महाराष्ट्र बीअर आणि वाईन निर्मिती नियम, १९६६ अन्वये मंजूर नमुना बीआरएल (वाईनरी) अनुज्ञप्तीधारक व्यक्ती व्यतिरिक्त अन्य व्यक्तीकडून खरेदी अथवा प्राप्त करता येणार नाही.

(६) अनुज्ञप्तीधारक त्याच्या अनुज्ञप्तीच्या ठिकाणी त्यास विकत घेण्याची किंवा ठेवण्याची किंवा विक्री करण्याची परवानगी नसलेले कोणतेही मद्य ठेऊ किंवा विक्री करू शकत नाही. त्याठिकाणी फक्त सीलबंद बाटलीतून वाईनची विक्री करता येईल. अनुज्ञप्तीधारक कोणतेही भेसळयुक्त, खराब किंवा बनावट मद्याची खरेदी, बाळगणे अथवा विक्री करू शकणार नाही.

(७) अनुज्ञप्तीधारक केवळ मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७० डी अंतर्गत एफएलएक्स-सी परवाना धारण करणाऱ्या व्यक्तीस वाईनची विक्री करू शकेल.

(८) या नियमांच्या नियम ५ अंतर्गत उप-नियम १० मधील कामकाजाचे तास आणि अनुज्ञप्ती बंद करणे या तरतुदी नमुना ई-४ अनुज्ञप्ती धारण करणाऱ्या अनुज्ञप्तीधारकास जशास तशा लागू राहतील.

(९) अनुज्ञप्ती सुरू झाल्याच्या तारखेपासून पुढील ३१ मार्च पर्यंतच्या कालावधीसाठी अनुज्ञप्ती मंजूर करता येईल.

(१०) या नियमांमधील नियम ५बी आणि ५सी मधील तरतुदीं, या नियमांतर्गत दिलेल्या अनुज्ञप्तीच्या उद्देशांसाठी जशास तशा लागू राहतील.

**३.** प्रधान नियमातील नमुना ई-२ नंतर खालील नमूने समाविष्ट केले जातील.

**"नमुना ई-३**

*[नियम ७ (२) पहा]*

सुपर मार्केटमध्ये किंवा वॉक इन स्टोअरमध्ये सीलबंद बाटलीमध्ये वाईन विक्रीसाठी परवाना मिळण्याकरिता अर्जाचा नमुना

१. अर्जदाराचे नाव व पत्ता

२. भागीदारांची पूर्ण नावे आणि पत्ता, असल्यास

३. ज्या ठिकाणी वाईनची विक्री केली जाईल त्या ठिकाणचा संपूर्ण पत्ता

४. उपरोक्त अ. क्र. ३ येथील प्रस्तावित जागा खालीलप्रमाणे आहे का,-

(अ) महानगरपालिका किंवा ' अ ' वर्ग किंवा 'ब ' वर्ग नगरपरिषदेच्या अधिकार क्षेत्रात असेल तर कोणत्याही शैक्षणिक किंवा धार्मिक संस्थेपासून किंवा राष्ट्रपुरुष/ थोर व्यक्ती यांचे पुतळे यापासून ५० मीटरच्या आत आणि इतर ठिकाणी १०० मीटरच्या आत.

(ब) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कोणत्याही बस थांबा, स्थानक किंवा आगारापासून १०० मीटरच्या आत.

५. अर्जदार सध्या व यापूर्वी सौम्य मद्य, वाईन किंवा विदेशी मद्य विक्रीचा परवाना धारण करीत आहे/ होता काय, असल्यास, तो कालावधी ज्या दरम्यान परवाना धारण केला आहे.

६. मांडणी किंवा शेल्फमध्ये ठेवण्यात येणारी वाईन आवश्यकतेनुसार सुरक्षितपणे कुलुपामध्ये ठेवण्याकरिता पुरेशी यंत्रणा आहे का ?

७. मांडणी किंवा शेल्फ सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरच्या मागील बाजुच्या कोपऱ्यात स्थित असल्याचे सूचित केले आहे का ?

८. अर्जदाराचा ऐपतदारी पुरावा.

९. अर्जदाराने धारण केलेला अबकारी/ पोलीस / नगरपालिकेकडील/ महानगरपालिकेकडील अनुज्ञप्ती यापूर्वी निलंबित अथवा रद्द झाली होती का, आणि तसे असल्यास, निलंबनाचा अथवा रद्द झाल्याचा कालावधी व त्याची कारणे.

१०. अर्जदाराकडे उत्पादन शुल्काची थकबाकी किंवा इतर कोणतीही सरकार थकबाकी जसे की, विक्रीकर, आयकर इत्यादी आहे का ?

मी, याद्वारे घोषित करते/करतो की, वर दिलेला तपशील /माहिती खरी आहे.

मी, याद्वारे हमी देते/देतो की, महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ व त्याअंतर्गत वेळोवेळी केलेले नियम, विनियम, आदेश तसेच अनुज्ञप्तींच्या अटी व शर्ती यांचे पालन करीन.

दिनांक : अर्जदाराची सही

प्रति,

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, ..........................”.

“ **नमुना ई-४**

*[नियम ७ (२) पहा]*

अनुज्ञप्ती क्र. ............................

....................सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरच्या जागेमध्ये एक मांडणी अथवा शेल्फमध्ये सीलबंद बाटलीमध्ये वाईन विक्री करण्यासाठी अनुज्ञप्ती

महाराष्ट्र दारुबंदी कायदा (१९४९ चा २५) च्या तरतुदी आणि त्या अंतर्गत केलेले नियम, विनियम आणि आदेश याअन्वये आणि त्यांना अधीन राहून .................................... यास (यात यानंतर याचा उल्लेख “ अनुज्ञप्तीधारक ” असा केलेला आहे.) नियम ७ अन्वये विहीत केलेले शुल्क व ठेव वसुल करून त्यांना दि. ....................................पासून (................) या जागी, सीलबंद बाटलीतून वाईन विकण्यास पुढील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अटीवर अनुज्ञप्ती मंजूर करण्यात येत आहे :—

१. अनुज्ञप्तीधारक राज्यातील बीआरएल वाईनरी अनुज्ञप्तीधारकांकडून किंवा मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ अन्वये देण्यात आलेल्या एफएल-१ किंवा एफएल/डब्ल्यु-१ परवानाधारकाकडून कायदेशीररित्या प्राप्त केली नसलेली अशी कोणतीही वाईन विकणार नाही.

२. अनुज्ञप्तीधारक अधीक्षकांनी मंजूर केलेल्या जागेव्यतिरिक्त अन्य ठिकाणी वाईनची विक्री करणार नाही. वाईन विक्रीची विनंती करणारा कोणताही फलक, चिन्ह किंवा जाहिरात सुपर मार्केट किंवा वॉक-इन-स्टोअरच्या प्रवेशद्वार, बाहेर किंवा आत प्रदर्शित केली जाणार नाही, हे अनुज्ञप्तीधारकाने सुनिश्चित केले पाहिजे.

३. अनुज्ञप्तीधारक मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम ७० डी अंतर्गत देण्यात येणाऱ्या एफएलएक्स/सी परवाना धारण केलेल्या व्यक्ती व्यतिरिक्त इतर कोणासही वाईनची विक्री करणार नाही.

४. (अ) अनुज्ञप्तीधारक त्यांच्या अनुज्ञप्ती परिसरात भेट देणाऱ्या अशा प्रत्येक व्यक्तीची कर्तव्यांवरील पोलीस अधिकाऱ्यास तात्काळ माहिती देईल, ज्यांच्यावर त्याला कायद्यानुसार गुन्हा केल्याचा संशय आहे आणि त्याची कृती सार्वजनिक शांतता भंग करण्याचा प्रयत्न करीत आहे.

(ब) अनुज्ञप्तीधारक वाईन विक्रीच्या स्वतंत्र रोख विक्रीपुस्तिका ठेवेल आणि आयुक्तांनी विहित केलेल्या नमुन्यात परिपूर्ण नोंदी ठेवेल आणि अशी रोख विक्रीपुस्तिका आणि नोंदी या अधिनियमाच्या कलम १२२ अंतर्गत अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करून देईल.

५. अनुज्ञप्तीधारक आयुक्त किंवा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क यांना वेळोवेळी आवश्यक असलेली आपल्या अनुज्ञप्तीअंतर्गत व्यवसायाशी संबंधित माहिती सादर करेल.

६. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या दुय्यम निरीक्षकापेक्षा कमी नसलेल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या कायदेशीर आदेश व सूचनांचे अनुज्ञप्तीधारक पालन करेल.

७. महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ५४ व ५६ मधील तरतुदींनुसार सदर अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करता येईल.

८. सदर अनुज्ञप्ती विधिग्राह्यतेच्या कालावधीत रद्द किंवा निलंबित झाल्यास अथवा मुदत समाप्तीनंतर नूतनीकरण न झाल्यास अनुज्ञप्तीधारक त्यांच्याकडे असलेला व विक्री न झालेला वाईनसाठा तात्काळ राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्याकडे समर्पित करेल. असा समर्पित वाईन साठा संबंधित अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विक्री करेल आणि अशा विक्रीतून आलेल्या रकमेतून विक्रीसाठी झालेल्या खर्चाची आणि राज्य शासनास देय असलेल्या रक्कमेची वसुली करून उर्वरित रक्कम अनुज्ञप्तीधारकास परत करेल.

दि. रोजी मंजूर केले.

ठिकाण :

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, .........................”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 31st March, 2022.

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No.BWR-1121/C.R.187 (Part-1)/Excise-3.—The following draft of rules, further to amend the Special Permit and Licences Rules, 1952, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of powers conferred by clause *(b)* of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949); and of all other powers enabling it in this behalf is hereby published, as required by sub-section (*3*) of the section 143 of the said Act, for the information of all persons likely to be affected thereby, and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after dated 29th June, 2022.

2. Any objection or suggestion which may be received, through Post or on following E-mail *dycomm-inspection@mah.gov.in,* by the Commissioner, State Excise, Maharashtra State, 2nd Floor, Old Custom House, Shahid Bhagatsingh Marg, Fort, Mumbai 400 023, from any person with respect to the said draft on or before the aforesaid date, will be considered by the Government.

### *DRAFT RULES*

**1**. These rules may be called the Special Permit and Licences (Amendment) Rules, 2022.

**2.** After rule 6 of the Special Permit and Licences Rules, 1952, the following rule shall be added, namely :—

" **7**. *Application for licence to sell wine in sealed bottles through a shelf or rack in Super Markets.—(1)* Any owner or manager of the Super Market or Walk-in-Store having minimum area of 100 square meter and walk-in with self service facility and also registered under section 6 of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017) desiring to setup a rack or shelf in his store for selling wine in sealed bottles to any person holding permit in Form FLX-C issued under rule 70D of the Bombay Foreign Liquor Rules, 1953, shall apply for a licence in Form E-3 to the Superintendent, State Excise of the district where his store is located, accompanied by a challan evidencing payment of an application fee of one hundred rupees.

(*2*) On receipt of application, the Superintendent, State Excise after duly considering the proposal and after satisfying himself, that the premises where it is proposed to sell wine are in conformity with the provisions of these rule and instructions issued in this behalf, by the State Government or the Commissioner, State Excise from time to time, and that there is no other objection to grant the licence applied for, may grant the licence in Form E-4, on payment of a deposit of Rs.1,000 and on payment of license fees as prescribed by the Commissioner, State Excise, from time to time.

*(3)* No licence under sub-rule *(2)* shall be granted in respect of the premises,—

(*a*) which, in the opinion of the Superintendent, State Excise, is not appropriate to display a rack or shelf of wine or where such rack or shelf is more than one in a premises or where such rack or shelf exceeds 2.25 cubic meter in volume; where such rack or shelf doesn't have a mechanism to keep it locked whenever necessary; where such rack or shelf is situated at the entrance or front side of the said Super Market or Walk-in Store and

where such rack or shelf is easily visible to passers-by from outside; or *(b)* which is situated in areas within the jurisdiction of any Municipal Corporation or 'A' or 'B' Class Municipal Council, is within a distance of fifty meters and, if situated elsewhere, one hundred meters from any educational or religious institution or any statue of national personality; or *(c)* which is situated within a distance of one hundred meters from any bus stand, station or depot of the Maharashtra State Road Transport Corporation; or *(d)* which is not duly approved by the Superintendent, State Excise or the officer authorised by him in this behalf and is not, for reasons to be recorded in writing, certified by him to be otherwise suitable also for locating the shop before the grant of the licence :

Explanation.—For the purpose of this sub-rule,—

*(i)* " educational institution " means any pre-primary, primary or secondary school managed or recognised by any local authority or the State Government or the Central Government and any college affiliated to any University established by law, but does not include any private coaching institution ;

*(ii)* "religious institution" means an institution for the promotion of any religion and includes a temple, math, mosque, church, synagogue, agiary or other place of public religious worship which is managed or owned by a public trust registered under the Maharashtra Public Trusts Act (XXIX of 1950) and includes such other religious institutions as the State Government may by order specify in this behalf ; or

*(iii)* the distance referred to in clause *(b)* or *(c)* of this sub-rule shall be measured from the mid-point of the entrance of the shop along the nearest path by which pedestrian ordinarily reaches,—

*(a)* the mid-point of the nearest gate of the institution if there is a compound wall and if there is no compound wall, the mid-point entrance of the institution, or

*(b)* the mid-point of the nearest gate of the bus stand, station or depot of the Maharashtra State Road Transport Corporation if there is a compound wall and if there is no compound wall, the nearest point of the boundary of such bus stand, station or depot, or

*(c)* the mid-point of nearest gate of statue, if there is compound wall, and if there is no compound wall, the nearest point of foundation of such statue.

*(iv)* Statue of national personality means any statue of national personality recognised by the Government and specified in the Schedule appended to these rules.

*(4)* Any premises in respect of which a licence in Form E-4 has been granted shall not be deemed to be situated within the prohibited distance referred to in clause *(b)* or *(c)* of sub-rule *(3)* if at any time after such licence is granted, —

*(a)* any institution or Statue of national personality referred to in clause *(b)* of sub-rule *(3)* comes into existence within a distance of fifty meters, or as the case may be, one hundred meters, from that premises, or

*(b)* if any bus stand, station or depot referred to in clause *(c)* of the said sub-rule *(3)* comes into existence within a distance of one hundred meters from that premises.

(*5*) Wine required for a licence holder shall not be bought or obtained except from a person holding a Trade and Import licence issued under the Bombay Foreign Liquor Rules, 1953 or BRL (Winery) licence issued under the Maharashtra Manufacture of Beer and Wine Rules, 1966.

(*6*) A licensee shall not keep or sell in the licensed premises Liquor of any other kind which he is not authorised to buy or keep or sell. Only wine in sealed bottles can be sold. The licensee shall also not receive, keep or sell any adulterated, deteriorated or spurious liquor of any kind.

(*7*) The licensee shall sell wine only to the persons holding permit in Form FLX-C issued under rule 70D of the Bombay Foreign Liquor Rules, 1953.

(*8*) The provisions of sub-rule (*10*) of rule 5 of these rules relating to working hours and closure of licensed premises shall, *mutatis mutandis* apply to the licensee holding licence in Form 'E-4'.

(*9*) The licence shall be granted for a period upto 31st March next following the date of the commencement of the licence.

(*10*) The provisions of rules 5B and 5C of these rules shall apply *mutatis mutandis* for the purposes of the licence granted under this rule.".

**3.** After Form E-2 appended to the principal Rules, the following Forms shall be inserted, namely :—

**" FORM E-3**

*[See sub-rule (1) of rule 7]*

*Form of application for a licence to sell wine in sealed bottles in Super Market or Walk-in Store.*

1. Name and address of the applicant :
2. Names and addresses in full of the partners, if any.
3. The address in full of the premises where wine would be sold.
4. Whether the proposed premises referred to at item 3 above are,—

(*a*) within 50 meters from any educational or religious institution or a statute of national personality, if they are within the jurisdiction of any Municipal Corporation or 'A' Class or 'B' Class Municipal Council and 100 meters if situated elsewhere.

(*b*) within 100 meters from any bus stand, station or depot of the Maharashtra State Road Transport Corporation.

5. Whether the applicant holds at present or held at any time in the past any licence for the sale of foreign liquor including mild liquor or wine and if so, the period during which it was held.

6. Whether the rack or shelf of wine to be kept on display has adequate mechanism to be kept securely locked whenever required.

7. Whether the rack or shelf has been denoted to be situated at the rear side corner of the Super Market or Walk-in Store.

8. Proof of solvency of the applicant.

9. Whether any Excise/Police/Municipal Licence held by the applicant was suspended or cancelled at any time in past, and if so, the period of such suspension or cancellation and the reason thereof.

10. Whether the applicant is in arrears of excise duty or in arrears of any other Government dues, such as Sales Tax, Income Tax, etc.

I, hereby declare that the particulars given above are correct.

I, hereby undertake to abide by the conditions of the licence and the provisions of the Maharashtra Prohibition Act, 1949, and the rules, regulations and orders made there under from time to time.

Date : Signature of the Applicant.

To,

The Superintendent, State Excise ...............".

**" FORM E-4**

*[See sub-rule (2) of rule 7]*

Lic. No. ............................

*Licence for sale of wine in a single rack or shelf in the Super Market or Walk-in-Store premises of a*

Licence is hereby granted under and subject to the provision of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) and the rules, regulations and orders made thereunder to ..........................................(hereinafter called "the licensee") on recovery of a fee and a deposit as prescribed under rule 7 authorising him to sell wine in sealed bottles during the period from ......................... at his [...............] situated at, subject to the following conditions, namely :—

(1) The licensee shall not sale any wine which has not been legally obtained either from the holder of BRL winery licence in the State or from the FL-I. or FL/W-I licence issued under the Bombay Foreign Liquor Rules, 1953.

(2) The licensee shall not sale wine in the premises which has not been duly approved by the Superintendent. The licensee shall also ensure that no board, sign or advertisements is displayed at the entrance, outside or within the Super Market or Walk-in-Store soliciting the sale of wine.

(3) The licensee shall not sale wine except to the person holding permit in Form FLX-C issued under rule 70D of the Bombay Foreign Liquor Rules, 1953.

(4) (*a*) The licensee shall given immediate information to the nearest Police Officer on duty of every person visiting his licensed premises, whom he suspects to have committed an offence under the Act and of every act committed there attending to disturb the public peace.

(*b*) The licensee shall maintain a separate cash memo book, for the sale of Wine and shall maintain proper accounts as may be prescribed by the Commissioner and such cash memo books and accounts shall always be open to inspection by any officer duly empowered under section 122 of the Act.

(5) The licensee shall furnish such information in connection with his business under the licence as may be required by the Commissioner or Superintendent, State Excise from time to time.

(6) The licensee shall comply with all lawful orders and instructions issued by the State Excise Officer not lower in rank than a Sub-Inspector of State Excise.

(7) This licence may be suspended or cancelled in accordance with the provisions of section 54 or 56 of the Maharashtra Prohibition Act.

(8) In case, this licence is cancelled or suspended during the currency of the licence period or is not renewed on its expiry, the licensee shall surrender the whole stock of unsold wine forthwith to the Superintendent, State Excise. The stock of wine so surrendered shall be sold by the Excise Officer and the proceeds of the sale shall after deducting the expenses and sum due to the State Government be returned to the licensee.

Granted this the........................... day of ..........................20

Place : Superintendent, State Excise ................".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.